# आई

नुसती तुझी आठवण, डोळ्या आणते पाझर
आई, तू का ग गेलीस ठेवून मला माघार?

कुठे असशील, कोण करीत असेल तुझी सेवा?
जीव माझा कासावीस आई तुझ्याविना

तू मायेची खाण, तू प्रेमाचा पूर
सारवून प्रेमाचे आंथरुण, घालून आठवणीचे पांघरुण
का गेलीस तू दूर?

चिमणेचिमणे घास भरवलेस, राखून आपले पान!
जोजो करीत, अंगाई म्हणत केलेस जीवाचे रान!

विजेच्या कडकडाटाचा बागुलबुवा
मिठीत तुझ्या शिरताची करीत असे माझा हेवा

गाय चाटे वासरू, चिमणी भरवी पिल्लांना
निसर्गात दिसता प्रेम असे, उणीव तुझी खटकते मनाला

तुझ्या इतकी प्रेमळ, खंबीर, दूरदर्शी
आहे का ग मी थोडीतरी तुझ्या सारखी?

इच्छा करते, पुढच्या जन्मी येवो मी तुझ्याच पोटी
पुन्हा एकदा टेकीन माथा तुझ्याच चरणी आई

परत फेडीची आशा कधी कधी दाटते मनी,
वाटते तूच येना पुढच्या जन्मी माझ्या पोटी
मग करीन मायेचा वर्षाव मीच तुझ्या ठायी
आहेत अशा या प्रेमाच्या गाठी

**- सौ. अरुंधती सरपटवारी** (बाल्टिमोर, मेरिलँड)